**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

### आरोग्य शिबीर

पुण्य नगरी

## थॅलेसेमिया मुक्तीसाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक : डॉ. बुलसरा

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

थॅलेसेमिया हा अनुवंशिक विकार असून यामुळे शरीरात पुरेसे हिमोग्लोबिन तयार होण्यात अडचणी येतात. त्यामुळे अशक्तपणा वाढून गंभीर गुंतागुंत निर्माण होते. या आजारामध्ये भारत जगात प्रथम क्रमांकावर आहे. सुदृढ भारत घडवायचा असेल तर थॅलेसेमिया मुक्तीसाठी जनजागृती व सामूहिक प्रयत्न आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. लिझा बुलसरा यांनी केले.



त्या रोटरी क्लब ऑफ चाकण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित थॅलेसेमिया जनजागृती व तपासणी शिबिरात बोलत होत्या. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, चाकण रोटरीचे अध्यक्ष डॉ. अमोल बेनके, रजनी दुवेदी, चंद्रकांत हिवरकर, महेंद्र गोरे, राजन जांभळे, जयश्री पडवळ, अजित वाळुंज, सुवर्णा गोरे, प्रियंका जगताप, भाऊसाहेब कोमल, डॉ. वैशाली परदेशी, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे उपस्थित होते.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी रोटरी क्लबच्या कार्याचे कौतुक केले. या शिबिरात महाविद्यालयातील २१० विद्यार्थ्यांची रक्त तपासणी करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. अमोल बेनके यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ यांनी केले तर आभार डॉ. किर्ती नितनवरे यांनी मानले.

Pimpri Chinchwad Edition
Mar 04, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

**पुढारी**

www.pudhari.com



थॅलेसेमिया विकारावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. लिझा बुलसरा.

# थॅलेसेमियामुक्तीसाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक : डॉ. बुलसरा

**खेड : पुढारी वृत्तसेवा**

थॅलेसेमिया हा अनुवंशिक विकार असून, यामुळे शरीरात पुरेसे हिमोग्लोबिन तयार होण्यात अडचणी येतात. त्यामुळे अशक्तपणा वाढून गंभीर गुंतागुंत निर्माण होते. या आजारामध्ये भारत जगात प्रथम क्रमांकावर आहे. सुदृढ भारत घडवायचा असेल, तर थॅलेसेमियामुक्तीसाठी जनजागृती व सामूहिक प्रयत्न आवश्यक असल्याचे प्रतिपादन पेडियाट्रिक, हेमॅटोलॉजिस्ट व ऑन्कोलॉजिस्ट तज्ज्ञ डॉ. लिझा बुलसरा यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शनिवारी (दि. १) आयोजित थॅलेसेमिया जनजागृती व तपासणी शिबिरात त्या बोलत होत्या. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, चाकण रोटरीचे अध्यक्ष डॉ. अमोल बेनके, रजनी दुवेदी, चंद्रकांत हिवरकर, महेंद्र गोरे, राजन जांभळे, जयश्री पडवळ, अजित वाळुंज, सुवर्णा गोरे, प्रियंका जगताप, भाऊसाहेब कोमल, डॉ. वैशाली परदेशी, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे उपस्थित होते.

या वेळी डॉ. बुलसरा यांनी थॅलेसेमिया आजाराची लक्षणे, परिणाम व उपचारपद्धतीबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. संस्थाध्यक्ष ॲड. बुट्टेपाटील यांनी रोटरी क्लबच्या कार्याचे कौतुक केले. या शिबिरात महाविद्यालयातील २१० विद्यार्थ्यांची रक्ततपासणी करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. अमोल बेनके, सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ व आभार डॉ. कीर्ती नितनवरे यांनी मानले.

My Gramin Edition
Mar 4, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

केसरी

# थॅलेसेमिया मुक्तीसाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक : डॉ. बुलसरा



**राजगुरुनगर : (वार्ताहर) :** थॅलेसेमिया हा अनुवंशिक विकार असून यामुळे शरीरात पुरेसे हिमोग्लोबिन तयार होण्यात अडचणी येतात. त्यामुळे अशक्तपणा वाढून गंभीर गुंतागुंत निर्माण होते. या आजारामध्ये भारत जगात प्रथम क्रमांकावर आहे. सुदृढ भारत घडवायचा असेल तर थॅलेसेमिया मुक्तीसाठी जनजागृती व सामुहिक प्रयत्न आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. लिझा बुलसरा यांनी केले. रोटरी क्लब ऑफ चाकण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित थॅलेसेमिया जनजागृती व तपासणी शिबिरात बोलत होत्या.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, चाकण रोटरीचे अध्यक्ष डॉ. अमोल बेनके, रजनी दुवेदी, चंद्रकांत हिवरकर, महेंद्र गोरे, राजन जांभळे, जयश्री पडवळ, अजित वाळुंज, सुवर्णा गोरे, प्रियंका जगताप, भाऊसाहेब कोमल, डॉ. वैशाली परदेशी, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे उपस्थित होते. डॉ. लिझा बुलसरा यांनी बोलताना थॅलेसेमिया आजाराची लक्षणे, परिणाम व उपचारपद्धतीबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली.

संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी रोटरी क्लबच्या कार्याचे कौतुक केले. बदलत्या जीवनमानामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या असून विद्यार्थ्यांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. या शिबिरात महाविद्यालयातील २१० विद्यार्थ्यांची रक्त तपासणी करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. अमोल बेनके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ यांनी केले. डॉ. किर्ती नितनवरे यांनी आभार मानले.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
28 Mar 2025 - Page 3



# थॅलेसेमिया मुक्तीसाठी सामुहिक प्रयत्न आवश्यक - डॉ. लिझा बुलसरा

**किरण खुडे**

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**
थॅलेसेमिया हा अनुवंशिक विकार असून यामुळे शरीरात पुरेसे हिमोग्लोबिन तयार होण्यात अडचणी येतात. त्यामुळे अशक्तपणा वाढून गंभीर गुंतागुंत निर्माण होते. या आजारामध्ये भारत जगात प्रथम क्रमांकावर आहे. सुदृढ भारत घडवायचा असेल तर थॅलेसेमिया मुक्तीसाठी जनजागृती व सामुहिक प्रयत्न आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. लिझा बुलसरा यांनी केले. त्या रोटरी क्लब ऑफ चाकण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित थॅलेसेमिया जनजागृती व तपासणी शिबिरात बोलत होत्या.

याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, चाकण रोटरीचे अध्यक्ष डॉ. अमोल बेनके, रजनी दुवेदी, चंद्रकांत हिवरकर, महेंद्र गोरे, राजन जांभळे, जयश्री पडवळ, अजित वाळुंज, सुवर्णा गोरे, प्रियंका जगताप, भाऊसाहेब कोमल, डॉ. वैशाली परदेशी, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे उपस्थित होते.

डॉ. लिझा बुलसरा यांनी बोलताना थॅलेसेमिया आजाराची लक्षणे, परिणाम व उपचारपद्धतीबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी रोटरी क्लबच्या कार्याचे कौतुक केले. बदलत्या जीवनमानामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या असून विद्यार्थ्यांनी आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले. या शिबिरात महाविद्यालयातील २१० विद्यार्थ्यांची रक्त तपासणी करण्यात आली.

प्रास्ताविक डॉ. अमोल बेनके, सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ व आभार डॉ. किर्ती नितनवरे यांनी मानले.

# 'थॅलेसेमिया मुक्तीसाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक'

**राजगुरुनगर, ता. ३ :** "थॅलेसेमिया हा आनुवंशिक विकार असून, यामुळे शरीरात पुरेसे हिमोग्लोबिन तयार होण्यात अडचणी येतात. त्यामुळे अशक्तपणा वाढून गंभीर गुंतागुंत निर्माण होते. या आजारामध्ये भारत जगात प्रथम क्रमांकावर आहे. सुदृढ भारत घडवायचा असेल, तर थॅलेसेमिया मुक्तीसाठी सामुहिक प्रयत्न आवश्यक आहे," असे प्रतिपादन रक्तविकार आणि कर्करोगतज्ज्ञ डॉ. लिझा बुलसरा यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ चाकण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राजगुरुनगर (ता. खेड) येथे थॅलेसेमिया जनजागृती व तपासणी शिबिर आयोजित केले होते. यावेळी डॉ. बुलसरा बोलत होत्या.

याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, चाकण रोटरीचे अध्यक्ष डॉ. अमोल बेनके, रजनी दुवेदी, चंद्रकांत हिवरकर, महेंद्र गोरे, राजन जांभळे, जयश्री पडवळ, अजित वाळुंज, सुवर्णा गोरे, प्रियांका जगताप, भाऊसाहेब कोमल, डॉ. वैशाली परदेशी, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे आदी उपस्थित होते. या शिबिरात महाविद्यालयातील २१० विद्यार्थ्यांची रक्त तपासणी केली. प्रास्ताविक डॉ. अमोल बेनके यांनी, तर सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ यांनी केले. डॉ. कीर्ती नितनवरे यांनी आभार मानले.

दै सकाळ

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख